

# ९० भारताचा महान्यायवादी

राज्यघटनेच्या कलम ७६ मध्ये भारताचा महान्यायवादी (Attorney General of India) पदाची तरतूद केली आहे.[१] हा देशातील सर्वोच्च कायदा अधिकारी आहे.

**नियुक्ती व कार्यकाल**

राष्ट्रपती महान्यायवाद्याची नियुक्ती करतो. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्त होण्यासाठीची अर्हता त्याच्या जवळ असली पाहिजे. म्हणजेच तो भारताचा नागरिक असला पाहिजे, त्याने कोणत्याही उच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून पाच वर्षे काम केले असले पाहिजे किंवा कोणत्याही उच्च न्यायालयात त्याने दहा वर्षे वकिली केलेली असावयास हवी किंवा राष्ट्रपतीच्या मते तो नामांकित कायदेपंडित असला पाहिजे.

राज्यघटनेमध्ये महान्यायवादी पदाचा कार्यकाल नमूद केलेला नाही. शिवाय त्याला पदच्युत करण्याविषयीची कारणे व प्रक्रिया राज्यघटनेत दिलेली नाही. राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत तो पदावर राहू शकतो. म्हणजेच राष्ट्रपती त्याला केव्हाही काढू शकतात. तोही राष्ट्रपतींना राजीनामा सादर करून पदमुक्त होऊ शकतो. सरकारच्या सल्ल्यानुसार त्याची नियुक्ती होत असल्याने ज्यावेळी सरकार (मंत्रिमंडळ) राजीनामा देते किंवा त्या जागी दुसरे सरकार येते, त्यावेळी प्रथेनुसार तो राजीनामा देतो.

महान्यायवाद्याचे वेतन घटनेने ठरविलेले नाही. राष्ट्रपती ठरवील त्याप्रमाणे त्याला वेतन मिळते.

**कर्तव्ये व कार्ये**

भारत सरकारचा मुख्य कायदा अधिकारी म्हणून कार्य करीत असताना त्याच्या कार्यात खालील बाबींचा समावेश होतो—

(१) राष्ट्रपतीने त्याच्याकडे पाठविलेल्या मुद्द्यांवर भारत सरकारला कायदेशीर सल्ला देणे.

(२) राष्ट्रपतीने सोपविलेली कायदेशीर स्वरूपाची इतर कामे करणे.

(३) राज्यघटना किंवा इतर कायद्यांनी त्याच्यावर सोपविलेली कार्ये करणे.

राष्ट्रपतीने सोपविलेली खालील कामे महान्यायवाद्याला करावी लागतात[२]—

(१) भारत सरकारशी संबंधित सर्व खटल्यांमध्ये भारत सरकारच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडणे.

(२) राज्यघटनेच्या कलम १४३ अनुसार राष्ट्रपतीने सर्वोच्च न्यायालयाकडे पाठविलेल्या बाबींमध्ये भारत सरकारचे प्रतिनिधित्व करणे.

(३) भारत सरकारशी संबंधित कोणत्याही खटल्यामध्ये भारत सरकारच्या वतीने उच्च न्यायालयात बाजू मांडणे.

### अधिकार व मर्यादा

अधिकृत कामे पार पाडण्यासाठी भारतीय क्षेत्रातील सर्व न्यायालयांमध्ये बाजू मांडण्याचा महान्यायवाद्याला अधिकार आहे. या शिवाय संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या कामकाजात किंवा त्यांच्या संयुक्त बैठकीत व संसदेच्या ज्या समितीचा तो सदस्य असेल त्यामध्ये सहभागी होण्याचा व बाजू मांडण्याचा त्याला अधिकार आहे; पण त्याला मतदानाचा अधिकार नाही. संसद सदस्यांना मिळणारे सर्व विशेषाधिकार संरक्षण व फायदे त्याला मिळतात.

कामांमधील गुंतागुंत व संघर्ष टाळण्यासाठी महान्यायवाद्यावर खालील मर्यादा घालण्यात आल्या आहेत—

(१) त्याने भारत सरकारविरुद्ध सल्ला देता कामा नये तसेच भारत सरकारविरुद्ध खटलाही चालविता कामा नये.

(२) ज्या प्रकरणात शासनाने त्याचा सल्ला मागितला असेल किंवा शासनाच्या वतीने शासनाची बाजू मांडण्यास सांगितली असेल अशा प्रकरणात त्याने अन्य कोणासही सल्ला देऊ नये किंवा अन्य कोणाच्या वतीने खटला चालवू नये.

(३) भारत सरकारच्या परवानगीशिवाय तो फौजदारी खटल्यात आरोपीची बाजू मांडू शकत नाही.

(४) भारत सरकारच्या परवानगीशिवाय तो कोणत्याही निगमात किंवा महामंडळात संचालकपद स्वीकारू शकत नाही.

असे असले तरी, महान्यायवादी हा भारत सरकारचा पूर्णवेळ सल्लागार नाही. तो सरकारी कर्मचारी नाही. शिवाय त्याला खाजगी कायदा व्यवसाय करण्यास प्रतिबंध नाही.

### भारताचा महान्यायअधिकर्ता

भारताच्या महान्यायवाद्याव्यतिरिक्त भारत सरकारचे इतर कायदा अधिकारी आहेत. ते म्हणजे भारताचा महान्यायअधिकर्ता (Solicitor General of India) व भारताचा अतिरिक्त महान्यायअधिकर्ता (Additional Solicitor General of India) हे होत. महान्यायवाद्यास त्याच्या अधिकृत जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी ते साहाय्य करतात. फक्त महान्यायवाद्याचे पद राज्यघटनेने निर्माण केले आहे, हे येथे नमूद केले पाहिजे. म्हणजेच कलम ७६ मध्ये महान्यायअधिकर्ता व अतिरिक्त महान्यायअधिकर्ता यांचा उल्लेख नाही.

महान्यायवादी हा केंद्रीय मंत्रिमंडळाचा सदस्य नसतो. सरकारी स्तरावर कायदेविषयक बाबींसाठी केंद्रीय मंत्रिमंडळात स्वतंत्र कायदा मंत्री असतो.[३]

**दृष्टिक्षेपात महान्यायवाद्याशी संबंधित कलमे**

| कलम | विषय |
|---|---|
| ७६ | भारताचा महान्यायवादी |
| ८८ | संसदेची गृहे व समिती यांसंदर्भात महान्यायवाद्याचे अधिकार |
| १०५ | महान्यायवाद्याचे अधिकार, विशेषाधिकार आणि संरक्षण उपाय |